**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात पहिल्याच दिवशी लोकसभेत पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर विरोधकांकडून चर्चेची मागणी, गदारोळामुळं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- जनतेच्या आकांक्षा हा अर्थसंकल्पाचा पाया आणि सरकारची जनतेसाठीची वचनबद्धता असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात रिक्षा परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित

- महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा उद्या शपथविधी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ३५३ अंकांची घसरण

**<><><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या कामकाजाला आज सुरुवात झाली. मात्र लोकसभेत आज पहिल्याच दिवशी विरोधकांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेच्या मागणीवरून केलेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. आज सकाळी लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यावर अलिकडेच निधन झालेले शिलाँगचे खासदार डॉ. रिकी अँड्र्यू जे. सिंकोन यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर तहकूब झालेलं कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर सभागृहानं टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकविजेत्या भारताच्या संघाचं अभिनंदन केलं, त्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सभागृहात निवेदन केलं. या भागातला तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीचा अवलंब करण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांचं निवेदन सुरु असताना विरोधी सदस्यांनी फलकांसह हौद्यात येत

पश्चिम आशियातल्या संघर्षावर चर्चेची मागणी केली. यावर गदारोळ कायम राहिल्यानं अखेर कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभा अध्यक्षांविरुद्धच्या प्रस्तावावर सरकार चर्चेसाठी तयार असतानाही विरोधी पक्ष इतर मुद्द्यांवरून गोंधळ घालत असल्याबद्दल संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारनं वित्तीय आणि व्यापार धोरणासह अनेक प्रशासकीय उपाययोजना केल्या असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली.

**<><><><><><>**

देशात इंधन प्रक्रियेनंतर अंदाजे १ हजार ९०० दशलक्ष मेट्रिक टनापेक्षा जास्त वापरायोग्य तेलइंधन साठा, तसंच नैसर्गिक वायू इंधनाचा १ हजार ८०० अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी आज राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. देशात कच्च्या तेलाचा ४२३ दशलक्ष मेट्रिक टनापेक्षा जास्त आणि नैसर्गिक वायूचा ५९५ अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेत आज पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा सुरु झाली. भाजपाचे घनश्याम तिवारी यांनी वनक्षेत्र वाढवण्यासह पर्यावरण रक्षणासाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. देशातल्या ६० कोटी लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो असा अंदाज नीयी आयोगानं व्यक्त केला असल्याचा मुद्दा वायएसआर काँग्रेस पक्षाचे अयोध्या रामी रेड्डी अल्ला यांनी मांडला.

आम आदमी पक्षाच्या स्वाती मालीवाल यांनी दिल्लीतल्या वायू प्रदूषणाचा मुद्दा मांडला. बीजू जनता दलाचे शुभाशिष खुंटिया, उज्ज्वल निकम, जनता दल

सेक्युलरचे एच. डी. देवेगौडा, अण्णा द्रमुकचे एम. धनपाल, बीआरएसचे रविचंद्र वड्डीराजू यांच्यासह इतर सदस्यांनीही या चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून जनतेच्या आकांक्षा हा अर्थसंकल्पाचा पाया आणि सरकारची जनतेसाठीची वचनबद्धता असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते 'सबका साथ सबका विकास' या धोरणाअंतर्गत अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमांतून विविध ठिकांणी आरोग्य सेवांचा विस्तार झाला आहे, याचा उल्लेख त्यांनी केला.

….. **होल्ड बाईट- प्रधानमंत्री - - -**

भविष्यात मुलींना तंत्रज्ञानात समान संधी मिळाव्यात आणि तरूण संशोधकांना नवोन्मेष आणि नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहित करणारी एक मजबूत संशोधन परिसंस्था निर्माण करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित करत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिली. यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार १ जानेवारी २०२६पर्यंत राज्यात १२ लाख ९६ हजार रिक्षा धावत आहेत. राज्यातल्या अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि वायूप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं.

याशिवाय राज्य शासनानं ओला, उबेर आणि रॅपिडोच्या इलेक्ट्रिक बाईकचे परवानेही रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

**होल्ड… बाईट - प्रताप सरनाईक**

<><><><><><>

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईत लोकभवन इथं होणार आहे. मुंबई उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देतील.

जिष्णुदेव वर्मा यांचं आज मुंबईत सपत्नीक आगमन झालं. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांचं स्वागत केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, इत्यादी मान्यवर त्यावेळी उपस्थित होते. लोकभवन इथं नवनियुक्त राज्यपालांना पोलिसांनी मानवंदना दिली.

<><><><><>

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचे पडसाद आजही देशातल्या शेअर बाजारांमधे उमटले. कच्च्या तेलाच्या दरात झालेली वाढ आणि जागतिक बाजारपेठेत विक्रीचा वाढलेला वेग यांमुळे आज दिवसाच्या सुरुवातीपासूनच शेअर बाजारांमध्ये घसरण सुरू होती. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ३५३ अंकांची घसरण झाली आणि तो ७७ हजार ५६६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४२२ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार २८ अंकांवर बंद झाला.

परकीय चलन बाजारांमध्ये रुपया ५८ पैशांनी घसरून ९२ रुपये आणि ३३ पैसे प्रति डॉलरच्या नीचांकी पातळीवर आला.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरांमधे वाढ झाली आहे. होर्मुझमार्गे वाहतूक बंद झाल्यानं पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, तसंच युद्ध स्थितीमुळे कुवैत आणि संयुक्त अरब अमिरातींसारख्या देशांनी खनिज

तेल उत्पादन आणि निर्यातीत कपात केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सध्या कच्च्या तेलाचं मूल्य प्रतिबॅरल ११० डॉलर्सच्या पुढे गेलं आहे. गेल्या सात दिवसात या दरात ५५ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे.

<><><><><><>

अमेरिका-इस्रायल आणि इराण दरम्यानच्या युद्धामुळे लेबनॉन संसदेनं आज आपला कार्यकाळ दोन वर्षांनी वाढवला आहे. लेबनीज संसदेत कार्यकाळ वाढवण्याच्या बाजूनं ७६ जणांनी मतदान केलं असून ४१ जणांनी विरोधात मतदान केलं. संसदेतल्या हिजब्ल्लाच्या १३ सदस्यांच्या गटानं मुदतवाढीच्या बाजूनं मतदान केलं.

<><><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विजयासाठी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. विश्वचषक जिंकल्याबद्दल, आज संसदेच्या आणि राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातही भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं.

<><><><><><>

इराणमधल्या भारतीय नागरिकांनी तिथल्या दूतावासाशी समन्वय साधल्याशिवाय, तिथून बाहेर निघण्यासाठी इराणच्या कोणत्याही सीमेकडच्या भागाकडे जाऊ नये असं आवाहन इराणमधल्या भारतीय दूतावासानं केलं आहे. यासंदर्भात भारताच्या दूतावासानं एक मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. एखाद्या व्यक्तीनं इराणचा भूप्रदेश सोडला आणि ती संबंधित तिसऱ्या देशात प्रवेश करू शकली नाही, तर दूतावास कोणतीही मदत करण्याच्या स्थितीत नसेल असंही दूतावासानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

इराणचे नवे नेते म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मोजतबा खामेनी यांचं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अभिनंदन केलं आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षादरम्यान त्यांनी इराणला रशियाचा पाठिंबा असल्याचं आश्वासनही पुतिन यांनी दिलं. इराणच्या धर्मगुरूंच्या मंडळानं काल दिवंगत नेते अयातुल्ला खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे पुत्र मोजतबा यांना नियुक्त केलं.

**//<><><><><><>//**